G.E. Society's SMRK-BK-AK Mahila Mahavidyalaya, Nashik.

# EVENT REPORT

**Department of Art and Painting (BVA)**

| | |
|---|---|
| **Name of the Program:** | "रंगस्पर्श आर्ट फेअर 2023" |
| **Day and Date:** | 21/ 08 / 2023 to 27/ 08 / 2023. (सोमवार ते रविवार) |
| **Organizing Committee:** | चित्रकला विभाग व डॉ. सौ. सुनंदाताई गोसावी आर्ट गॅलरी यांच्या संयुक्त विद्यमाने. |
| **Timing:** | 10:00 a.m. ते 8.00 p.m. |
| **Chief guest :** | **प्रख्यात चित्रकार श्री. पंडीत खैरनार** |
| **YouTube Link:** | https://youtu.be/x-4HSLA_sPo |
| **President :** | **डॉ. सौ. दीप्ती देशपांडे.** **प्राचार्या - एस. एम. आर. के. बी. के. ए.के महाविद्यालय, सचीव - गोखले एज्युकेशन सोसायटी.** |
| **No. of Students Attended Programs / Views:** | सर्व बी.व्ही.ए. चे विद्यार्थी व शिक्षकवृंद, नाशिक येथील प्रख्यात वास्तूविशारद, कलावंत, कलारसिक, लेखक, कवी, उद्योजक, फोटोग्राफर इत्यादी साधानणत: दोन हजार ते दोन हजार पाचशे व्यक्तींनी या प्रदर्शनाचा व प्रात्यक्षिकांचा लाभ घेतला. |
| **Brief Summary:** | गोखले एज्युकेशन सोसायटीचे आधारस्तंभ असणारे सर डॉ. मो. स. गोसावी यांना आदरांजली. प्रित्यर्थ दि 21/08/2023 रोजी एस.एम.आर.के.बी.के.ए.के. महिला महाविद्यालयाच्या आर्ट ॲण्ड पेंटींग विभागाच्या वतीने रंगस्पर्श आर्ट फेअर 2023 चे आयोजन करण्यात आले. यंदाच्या वर्षी प्रदर्शन नाशिककरांसाठी नव्याने उपलब्ध झालेल्या डॉ. सौ. सुनंदाताई गोसावी कलादालनाच्या उद्‌घाटनाच्या निमित्ताने आयोजिले गेले होते. दि. 21/08/2023 ते दि. 27/08/2023 पर्यंत सकाळी 10.00 ते सायं. 5.30 वाजेपर्यंत सात दिवसांकरता नाशिकमधील कला रसिकांसाठी खुले होते. पहिल्या दिवशी दि. 21/08/2023 रोजी उद्‌घाटनाचा सोहळा सुंदररित्या पार पडला. पुढील पाच दिवस, कार्यशाळा, परिसंवाद, प्रात्यक्षिके झाली. नाशिकमधील सन्माननीय कलावंत श्री. अशोक धिवरे, श्री. संजय बागुल या ज्येष्ठ कलावंतांच्या प्रात्यक्षिकांचा लाभ नाशिककरांना घेता आला. 100 चौ. फुटाच्या भव्य कलादालनात एकूण 150 ते 200 कलाकृती प्रदर्शित झाल्या. बी. व्ही. ए. च्या ज्युनिअर व सिनिअर महाविद्यालयाच्या आजी व माजी विद्यार्थिनींच्या कलाकृती प्रामुख्याने (स्टिल्स लाईक, निसर्ग चित्रण म्यूरल, कंपोझिशन इ.) होत्या. त्याबरोबर कलादालनाचे उद्‌घाटनाचे प्रयोजन लक्षात घेऊन नाशिक व |

महाराष्ट्राच्या कला विश्वाला समृद्ध ज्यांनी केले, असे जेष्ठ कलावंत स्वर्गीय श्री. शिवाजीराव तुपे, श्री. मदन गर्गे, श्री. वा. गो. कुलकर्णी यांच्या कलाकृती या प्रदर्शनाचा मानबिंदू ठरल्या. प्रदर्शनादरम्यान पुढील सातही दिवस ज्ञानमहर्षी सर डॉ. मो.स. गोसावी यांचे जीवनपथ दर्शक, विचार, चित्रफीत स्वरुपात प्रसारित व संचालित करण्यात आले होते. या प्रदर्शनाच्या व कलादालनाच्या उद्घाटन सोहळ्यास तसेच पुढील सातही दिवस नाशिकच्या अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या. या प्रसंगी नाशिकचे अनेक दिग्गज कलावंत व आर्किटेक्टस् यांना आमंत्रित केले व त्यांना शाल, मोमेंटो, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. अनेक शाळा, महाविद्यालये (बी.वाय.के, आर.वाय.के, पेठे हास्कुल, लेले हायस्कुल, रचना विद्यालय, नर्सिंग कॉलेज, इंजिनिअरींग कॉलेज, मालतीबाई कुलकर्णी विद्यालय, अरविंद मनोहरपंत कुलकर्णी इंग्लिश मिडियम स्कुल, जे.डी.सी.बिटको स्कुल इ. अनेक शाळा महाविद्यालयांनी भेट दिली. तसेच प्राचार्य, मुख्याध्यापक, संस्थेचे अनेक सन्माननीय मान्यवर डॉ. राम कुलकर्णी, (विभागीय सचिव), डॉ. आर.पी. देशपांडे विश्वस्त, आर्किटेक संजय पाटील, वैशाली प्रधान,चित्रकार रामदास महाले, प्रसाद पवार, श्रीमती जयलक्ष्मी, श्रीमती नमिता गिरी (फॅशन डिझायनिंक इंचार्ज) श्रीमती नमिता पवार (आर.टी.ओ. ऑफिसर) अलका घरटे, जया तेजनकर (सुप्रसिद्ध बिल्डर्स) अशा अनेक मान्यवरांनी प्रदर्शनास व उद्घाटन सोहळ्यास उपस्थिती लावली. त्यांच्या शुभेच्छा या प्रदर्शनास मिळाल्या. प्रदर्शनाची दखल लोकमत, गावकरी, लोकसत्ता, सकाळ, पुण्यनगरी अशा अनेक दैनिकांनी घेतली.

या प्रसंगी माजी विभागप्रमुख श्रीमती सौ. संध्या केळकर, श्रीमती छाया खुळगे, सत्कारार्थी कलावंत श्री. रामदास महाले, श्री. तेजस गर्गे, श्री. दिनकर जानमाळी श्री. संजय बागुल, श्री. सुरेश भोईर, श्री. अशोक धिवरे, श्री. प्रफुल्ल सावंत, श्री. मुक्ता बालिका, श्री. धनंजय गोवर्धने, श्री. मुंजा नरके, जेष्ठ वास्तुविशारद, श्री. संजय पाटील, श्रीमती वैशाली प्रधान, श्री. रोहन जाधव, श्री. अमोल चौधरी यांचा सत्कार प्राचर्या, उपप्राचार्याचे उपस्थितीत उद्घाटन सोहळा संपन्न झाला. २००० ते २५०० प्रेक्षकांनी लाभ घेतला.

दि. २१ ऑगस्ट ते २७ ऑगस्ट दरम्यान सात दिवसांकरता प्रचंड उत्साहात रसिक प्रेक्षकांनी प्रदर्शन व आयोजित प्रात्यक्षिके, व्याख्याने इ.चा लाभ घेतला. साधारणत: २००० ते २५०० रसिक प्रेक्षकांची उपस्थिती होती. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. दिप्ती देशपांडे मॅडम, उपप्राचार्या डॉ. सौ. निलम बोकिल मॅडम यांच्या मार्गदर्शनामुळे यशस्वीरित्या या प्रदर्शनाचे आयोजन झाले. त्याचबरोबर, बी. व्ही. ए. चे सर्व प्राध्यापक वृंद (सिनिअर व ज्युनिअर) श्रीमती सौ. भारती हिंगणे, प्रा. श्री. सुमतीलाल बागडे, प्रा. श्री. गौरव भावसार, प्रा. द्विप आहेर या सर्वांचे अथक परिश्रम व विद्यार्थिनींचा उत्साह या सर्वांचे उत्तम यश या आर्ट फेअर मुळे मिळाले.

एस.एम.आर.के.बी.के.ए.के. महिला महाविद्यालयाच्या आर्ट ॲण्ड पेंटींग विभागाचे रंगस्पर्श आर्ट फेअर २०२३ चे आयोजन यंदाच्या वर्षी, कॉलेजरोड येथील डॉ. सुनंदाताई गोसावी या कलादालनाच्या उद्घाटनाच्या निमित्ताने दि. २१. ०८ .२०२३ रोजी करण्यात आले. सकाळी १० वाजल्यापासून ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत पुढील सात दिवस हे

| | |
|---|---|
| | कलाप्रदर्शन व आर्ट फेअर नाशिकमधील कलारसिकांकरीता (दि. २७. ०८. २०२३ पर्यंत) खुले होते. यादरम्यान विविध कार्यशाळा, परिसंवाद व प्रात्यक्षिके झाली.<br>दि. २१. ०८ .२०२३ रोजी, उद्घाटन सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार श्री. पंडित खैरनार व अध्यक्षस्थानी संस्थेच्या खजिनदार, सचिव, श्रीमती डॉ. सौ. दीप्ती देशपांडे हे मान्यवर लाभले. संस्थेचे विभागीय सचिव प्रा. डॉ. राम कुलकर्णी, संस्थेचे विश्वस्त डॉ. आर. पी. देशपांडे, उपप्राचार्या डॉ. सौ. निलम बोकिल, उपप्राचार्या डॉ. कविता पाटील, कलादालनाचे प्रमुख आर्किटेक पाबारी सर इ. सन्माननीय व्यासपीठावर उपस्थित होते. उदघाटन सोहळ्याचे औचित्याने, नाशिकच्या नामवंत वास्तुविशारदांचा (एकूण ५) व नामवंत कलाकारांचा (एकूण १२) शॉल, मोमेंटो, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच ज्या करिअरच्या मार्गावर वेगवेगळेपणाचा ठसा उमटवत आहेत, अशा मी विद्यार्थिनींचा देखील सत्कार केला गेला. या प्रसंगी प्राध्यापक द्विप अहेर यांनी बनवलेले, नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे शिल्प-सन्मानचिन्ह म्हणून विभागाच्या वतीने अध्यक्षस्थानी असलेल्या प्राचार्या, तसेच संस्थेच्या खजिनदार व सचिव डॉ. सौ. दीप्ती देशपांडे यांना देऊन गौरवण्यात आले.<br>उपप्राचार्या डॉ. सौ. निलम बोकिल यांनी स्वागतपर भाषणात, रंगस्पर्श या चित्रप्रदर्शनाविषयीची माहिती व बी.व्ही.ए. चा अभ्यासक्रमाचे वेगळेपण म्हणजे व्यक्तिमत्व विकासाची संधी कशी आहे याबद्दल सांगितले. कलादालनाचे प्रमुख म्हणून आर्किटेक्ट संजय पाबारी यांनी गॅलरीच्या निर्मितीमागे नाशिकचे कलाविश्व संपन्न होण्याचा उद्देश असल्याचे स्पष्ट केले. यापुढे नाशिकरांना मुंबई, दिल्ली प्रमाणे सुसज्ज व भव्य कलादालन उपलब्ध होणार असल्याचे सांगून सदिच्छा व्यक्त केल्या. प्रमुख अतिथि (चित्रकार) श्री. पंडीत खैरनार यांनी त्यांच्या भाषणातून विद्यार्थिनींचे कौतुक व्यक्त केले. ''कलाकृती या कलेच्या व्याकरणाला समजुन घेतल्यास अधिक खुलतात'' हे 'गमक' उलघडले. पुढे अध्यक्षा डॉ. सौ. दीप्ती देशपांडे यांनी या महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या सन्माननीय डॉ. सौ. सुनंदाताई गोसावी यांचे नाव या कलादालनास देणे संयुक्तिक आहे याविषयी नमूद करुन डॉ. सौ. सुनंदाताई गोसावी यांची दूरदृष्टी व योगदानामुळे महाविद्यालयातील कला शाखा व चित्रकला संगीत विभागची स्थापना सर्वप्रथम इथे झाल्याचे सांगितले. नाशिकच्या सर्व कलावंतांच्या वतीने सन्माननीय श्री. अनिल अभंगे यांनी महाविद्यालयाचे व संस्थेचे अभिनंदन केले. भविष्यातील कलाविषयक घडामोडींची इथे सुरवात होईल असे आश्वासन देऊन, कलादालनाच्या व्यवस्थापकिय मंडळाचे आर त्यांनी आभार मानले. पुढे विभागप्रमुख सौ. अर्चना सोनावणे यांनी विभागाचे व महाविद्यालयाच्या वतीने सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त केले.<br>या प्रदर्शनात साधारणत: १५० कलाकृती विशेषत: स्टिल लाईक, २ डी डिझाईन, लॅंडस्केप, म्युरल इ. विषयांची विविधता होती. त्यासोबतच सर्व शिक्षकांच्या कलाकृती प्रदर्शित झाल्यास. श्रीमती भारती हिंगणे, श्रीमती सोनावणे अर्चना, श्री. सुमतीलाल बागडे, श्री. गौरव भावसार, श्री. द्विप आहेर, श्री. शैलेंद्र गौतम, श्री. शाम जाधव या आजी व माजी विद्यार्थिनी यांची चित्रे व शिल्प यांनी कलादालन, सज्ज झाले. तसेच महाराष्ट्राचे व |

नाशिकचे कलाविश्व ज्यांनी समृद्ध केले असे ज्येष्ठ कलावंत स्वर्गीय श्री. शिवाजीराव तुपे, श्री. मदन गर्गे, श्री. वा. गो. कुलकर्णी यांच्या कलाकृती या प्रदर्शनाचा मानबिंदू ठरल्या.

पुढील पाच दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन झाले. त्याचा अहवाल पुढील प्रमाणे-

- दि. २२. ०८ .२०२३, मंगळवार, दु. ४:३० ते सायं. ५:४५
  विषय : 'जलरंग निसर्गचित्रण'
  आमंत्रित कलावंत : श्री. अशोक धिवरे

प्रदर्शनाच्या दुसऱ्या दिवशी नाशिकचे सन्माननीय, प्रथितयश कलावंत श्री. अशोक धिवरे यांचे जलरंगात निसर्ग चित्रणाचे प्रात्यक्षिक झाले. या कार्यक्रमात महाविद्यालयाच्या वतीने विभागप्रमुख श्रीमती सौ. अर्चना सोनावने यांनी सरांचे स्वागत केले. नाशिक कला निकेतन, के.के. वाघ, गोखले एज्यु. इंजिनिअरिंग कॉलेज, ललितकला इ. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा आनंद घेतला. सरांची शैली जवळून अभ्यासण्याची ही संधी नाशिकच्या कला विद्यार्थ्यांनी घेतली. उपस्थित श्री. अशोक धिवरे सरांनी स्वतःची नसर्गाशी जवळीक असल्यामुळे व कलावंत होण्याची महत्वाकांक्षा यामुळे आजचे यश मिळवू शकलो हे सांगितले. श्री. कैलास हयाळीज, श्री. अतुल भालेराव, श्रीमती मुक्ता बालीमा शुभेच्छा देण्यास उत्सुक होते. प्रात्यक्षिकानंतर श्री. अशोक धिवरे यांनी रसिक प्रेक्षक व विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. प्रा. द्विप आहेर यांनी आभार व्यक्त केले. श्री. अशोक धिवर यांनी संस्थेविषयी, महाविद्यालयाविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

- दि. २३. ०८. २०२३, बुधवार, दु. ४:३० ते सायं. ५:४५
  विषय : 'रंगाचे मानसशास्त्र'
  वक्ता : श्रीमती मानसी सागर.

प्रदर्शनाच्या तिसऱ्या दिवशी चित्रकर्ती व प्राध्यापिका श्रीमती मानसी सागर यांचे 'रंगाचे मानसशास्त्र' या विषयावर व्याख्यान व सादरीकरण झाले. हे आपल्या अबोध मनावर कसे काम करतात हे त्यांनी पटवून दिले. जाहिरातींच्या जगात व सामाजिक संदर्भात याचा आपल्याला प्रत्यय येतो. याचे योग्य उदा. देऊन त्यांनी विश्लेषण केले. रसिक श्रोते व विद्यार्थिनींसोबत संवाद साधला. व्याख्यातांचे स्वागत प्रा. द्विप आहेर यांनी केले. आभार विभागप्रमुख सौ. अर्चना सोनावणे यांनी व्यक्त केले. महाविद्यालयाप्रती व संस्थेप्रती आमंत्रित कलावंत व व्याखाती श्रीमती मानसी सागर यांनी कृतज्ञता व्यक्त करुन विभागास, विद्यार्थिनींना शुभेच्छा दिल्या.

| | |
|---|---|
| | ▪ दि. २४. ०८. २०२३, गुरुवार, दु. ४:३० ते सायं. ५:४५<br>विषय : 'मातीचे पॉटरी प्रात्यक्षिक'<br>आमंत्रित कलावंत : पॉटरी आर्टिस्ट सौ. कविता बागडे.<br>प्रदर्शनाच्या चौथ्या दिवशी पॉटरी आर्टिस्ट श्रीमती सौ. कविता बागडे यांचे प्रात्यक्षिक डॉ. सौ. सुनंदाताई गोसावी कलादालनाच्या परिसरातील, तळमजल्यावर आयोजिले होते. आमंत्रित कलावंतांनी टेराकोटा मातीची विविधता व क्षमता यांची माहिती, इलेक्ट्रिक व्हिलची तांत्रिक माहिती देऊन प्रात्यक्षिकास सुरुवात केली. मातीच्या भांड्यांचा वापर आपण प्राचीन संस्कृतीपासून पाहत आहोत. मातीचे प्रकार व ते वापरत असताना आपण कोणत्या गोष्टींची काळजी घ्यायची हे त्यांनी कार्यशाळेदरम्यान समजावून सांगितले. काही विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिक स्वत: करण्याचा अनुभवही घेतला.<br>कार्यशाळेची सुरुवात प्रा. द्विप आहेर यांच्या स्वागतपर प्रास्तविकाने झाली. आमंत्रित आर्टिस्ट यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधत प्रात्यक्षिक सादर केले. आभार प्रदर्शन श्रीमती सौ. भारती हिंगणे यांनी केले.<br><br>▪ दि. २५. ०८ .२०२३, शुक्रवार, दु. ४:३० ते सायं. ५:४५<br>विषय : 'कलेच्या क्षेत्रातील करिअरच्या संधी' या विषयावर व्याख्यान.<br>वक्ता : प्रा. श्री. द्विप आहेर.<br>प्रदर्शनाच्या पाचव्या दिवशी प्राध्यापक व शिल्पकार श्री. द्विप आहेर यांनी वरील विषयावर माहिती देण्यासाठी आमंत्रित केले होते. पी.पी.टी. व व्याख्यान स्वरुपात विद्यार्थीनींसमोर कला स्नातक झाल्यानंतर कोणत्या संधी आहेत हे मांडले व आत्मविश्वास, इच्छाशक्ती व पाठपुरावा यांच्या जोरावर आज अस्तित्वात असूनही माहिती नसलेल्या विविध संधी कशा सहजपणे साधता येतील याविषयी सरांचे मार्गदर्शनन लाभले. विविध शासकिय, निमशासकीय कला विषयक धोरणे, शिष्यवृत्ती, नोकऱ्या व नोकरी न करताही मिळवता येणारे उत्पन्न यांचा खुलासा केला. केवळ कलावंतांसाठी शासनव्यवस्थेत कुठे कुठे आरक्षण आहेत. याविषयची मोलाची माहीती सरांनी दिली.<br>व्याख्यानाची सुरुवात प्राध्यापिका सौ. भारती हिंगणे यांच्या प्रास्ताविकर स्वागताने झाली. सरांनी संस्थेचे व महाविद्यालयाचे आभार व्यक्त करुन सर्व कलावंत व विद्यार्थ्यांनींना भावी मार्गक्रमणासाठी सदिच्छा दिल्या. प्राध्यापक श्री. गौरव भावसार यांनी आभार व्यक्त केले.<br><br>▪ दि. २६. ०८ .२०२३, शनीवार, दु. ४:३० ते सायं. ५:४५<br>विषय : 'तैलरंग माध्यमातील व्यक्तिचित्रण'<br>आमंत्रित चित्रकार : सन्माननीय श्री. संजय बागुल. |

| | |
|---|---|
| | प्रदर्शनाच्या सहाव्या दिवशी तैलरंग माध्यमातील व्यक्तिचित्रणासाठी नाशिकचे प्रथितयश चित्रकार प्रा. श्री. संजय बागुल यांचे प्रात्यक्षिक ठेवले होते. महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. सौ. निलम बोकिल मॅडम यांनी वेळात वेळ काढून, विभागाच्या आग्रहाखातर प्रात्यक्षिकासाठी 'सिटींग' दिले. नाशिक कला निकेतन येथून श्री. बागुल सर सेवानिवृत्त आहेत व अजूनही पूर्वी इतकिच त्यांच्या व्यक्तिचित्रणास लोकप्रियता असल्याचे एकंदरीत उपस्थित गर्दीवरुन लक्षात आले. व्यावसायिक व्यक्तिचित्रण व ॲकेडमिक व्यक्तिचित्रण यातला करक सरांनी संवादातून समजावून सांगितला या प्रात्यक्षिकाचा लाभ आपल्या विद्यार्थिनींबरोबरच के.के.वाघ, ललित कला, नाशिक कला निकेतन येथील विर्थ्यांनीसुद्धा घेतला.<br><br>प्रात्यक्षिकाच्या सुरुवातीस प्रा. द्वीप आहेर यांनी सरांची ओळख औपचारिकरित्या करून दिली. महाविद्यालयाच्या माजी समन्वयक श्रीमती जोगी मॅडम यांच्या हस्ते श्रीमती सौ. सोनावणे अर्चना यांनी महाविद्यालयाच्या विभागाच्या वतीने सरांचे ऋण व्यक्त केले. सरांनी प्राध्यापकांना, विद्यार्थिनींना (ज्युनिअर व सिनिअर) शुभेच्छा दिल्या. यावेळी विभागाच्या वतीने मॉडेल म्हणून बसलेल्या, महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. सौ. निलम बोकिल यांना प्रा. द्विप आहेर यांनी बनवलेले नामदार गोपाळकृष्ण गोखले यांचे छोटे (बस्ट) स्मृती शिल्प हे सन्मान चिन्ह म्हणून विभागप्रमुखांच्या हस्ते दिले गेले व या प्रात्यक्षिकाच्या कार्यक्रमाचा समारोप झाला.<br><br>▪ दि. २७. ०८ .२०२३, रविवार, देखील प्रेक्षकांचा ओघ लक्षात घेऊन कलाप्रदर्शन सकाळी १०: ०० ते सायंकाळी ५: ४५ पर्यंत खुले ठेवले गेले. शेवटच्या दिवसापर्यंत रसिक व मान्यवरांनी या प्रदर्शनास भरभरुन प्रतिसाद दिला. प्राचार्या डॉ. सौ. दीप्ती देशपांडे मॅडम यांच्या प्रोत्सहानामुळे विद्यार्थिनींच्या अनेक कलाकृती विकल्या गेल्या. यातून विद्यार्थीनींना 'रंगस्पर्श' २०२३ हे एक व्यासपीठ म्हणून मिळाले. या उपक्रमातून विद्यार्थिनींचा आत्मविश्वास वाढला. |
| **Signature of Committee In-Charge / H.O.D** | श्रीमती सोनावणे अर्चना<br>(विभाग प्रमुख बी. व्ही. ए.) |

## रंगस्पर्श २०२३ चे क्षणचित्रे (फोटो)
## डॉ. सौ. सुनंदाताई गोसावी कलादालन उद्घाटनाची फोटो. (दि. २१/०८/२०२३)

















GOKHALE EDUCATION SOCIETY
Prin. T. A. Kulkarni Vidyanagar, Nashik














BRAINOVA






## ‘जलरंग निसर्गचित्रण प्रात्यक्षिक’ - आमंत्रित कलावंत : श्री. अशोक धिवरे. (दि: २२. ०८ .२०२३)























श्रीमती मानसी सागर यांचे ‘रंगाचे मानसशास्त्र’ या विषयावर व्याख्यान. (दि. २३. ०८. २०२३)













पॉटरी आर्टिस्ट श्रीमती सौ. कविता बागडे यांचे प्रात्यक्षिक. (दि. २४. ०८. २०२३)


















Samsung Dual Camera
Shot with my Galaxy M20



प्रा. द्विप आहेर यांचे 'कलेच्या क्षेत्रातील करिअरच्या संधी' या विषयावर व्याख्यान. (दि. २५. ०८ .२०२३)



















FOR SALE
FOR SALE

प्रा. श्री. संजय बागुल यांचे 'तैलरंग माध्यमातील व्यक्तिचित्रणाचे' प्रात्यक्षिक. (दि. २६. ०८ .२०२३)


























